। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव – ४२५००१

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON - 425001

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५

जा.क्र.उमवि/२/ २०७ /२०१५ दि.११.०८.२०१५

प्रति,
**मा.अध्यक्ष,**
भुसावळ कला, विज्ञान आणि
पु. ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय,
भुसावळ

**विषय :- "उत्कृष्ट महाविद्यालय" पुरस्कारासाठी निवड.**

**महोदय,**

आपणास विदितच आहे की, उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे **"उत्कृष्ट प्राचार्य/संचालक, उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट महाविद्यालय व उत्कृष्ट शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी"** पुरस्कार योजना सुरु करण्यात आलेली आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीतील आपल्या महाविद्यालयाचा वाटा तसेच आपल्या महाविद्यालयात आपण जोपासलेला शैक्षणिक दर्जा याचा विचार करुन मा.कुलगुरू महोदयांनी सन २०१४-२०१५ साठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था मधून भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ या महाविद्यालयाची **"उत्कृष्ट महाविद्यालय"** पुरस्कारासाठी निवड केलेली आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा वर्धापन दिन व रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून दि.१५ ऑगस्ट, २०१५ रोजी सकाळी ८.३० वाजता सदर पुरस्कार वितरण सोहळा विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित करण्यात आलेला असून सदर कार्यक्रमास **माननीय डॉ.भालचंद्र मुणगेकर, सदस्य, राज्यसभा, माजी सदस्य, राष्ट्रीय योजना आयोग, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ** हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तरी सदर संस्थेचे अध्यक्ष या नात्याने **"उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार"** स्वीकारण्यासाठी आपण दि.१५ ऑगस्ट, २०१५ रोजी आयोजित केलेल्या सदर पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित रहावे हे आग्रहाचे निमंत्रण.

आपल्या महाविद्यालयास मिळालेल्या पुरस्काराबद्दल आपले हार्दीक अभिनंदन.
भावी वाटचालीत उत्तरोत्तर प्रगतीसाठी शुभेच्छा.

आपला विश्वासू,

(प्रा.अ.म.महाजन)
**कुलसचिव**

प्रत माहितीसाठी.

१. मा.प्राचार्य, भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ
२. मा.वित्त व लेखा अधिकारी, उमवि., जळगाव - प्रवास व दैनिक भत्ता अदायगीसाठी.
३. विशेष कार्य अधिकारी, कुलगुरू कार्यालय, उमवि., जळगाव.
४. उपकुलसचिव, प्रशासन विभाग, उमवि., जळगाव.

पत्र पेटी क्र. : ८०,उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५८४२८ ते २२५८४३८, फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon
Telephone Nos.: 0257-2258428 to 2258438, Fax Nos. : 0257-2258403, 406 E-mail : registrar@nmu.ac.in